RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# ''कुसुमाग्रजांच्या काव्यातील प्रतिमा''
# 'विशाखा'च्या आधारे

**डॉ.बाबासाहेब पिरगोंडा नाईक**
मराठी विभागप्रमुख
चंद्राबाई-शांताप्पा शेंडुरे कॉलेज हुपरी
ता. हातकणंगले जि. कोल्हापूर.
मोबाईल ९८५०८७२०५२

## प्रास्ताविक

मराठी साहित्य विश्वात आपल्या लेखणीने एक अढळ स्थान निर्माण करणारे व मानवाला स्वातंत्र,समता बंधुता आणि मानवतावाद ही मूल्ये जोपासण्यास सांगणारा मराठी साहित्यामधील थोर साहित्यिक वि.वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज म्हणजे मराठी भाषेतील एक अगळं आणि वेगळं व्यक्तिमत्व आहे. साहित्याच्या सर्व प्रकारामध्ये त्यांच्या लेखणीने संचार केलेला आहे.कथा,कादंबरी,नाटक,कविता,चरित्र,आत्मचरित्र यापैकी **कविता** आणि **नाटक** या त्यांच्या दोन वाङ्:मय प्रकाराकडे पाहिले असता ते अधिकच लोकप्रिय झालेले दिसून येतात. म्हणूनच 'विशाखा' हा कविता संग्रह मध्यवर्ती मानून व त्यांचे संपूर्ण साहित्य विचारात घेऊन त्यांना **साहित्यामधील सर्वोच्च** सन **१९८७ साली ''ज्ञानपीठ''** पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर दुस-या बाजूला **'नटसम्राट'** या नाटकाने दोन पिढीतील चालणारा संघर्ष मोठया ताकदीने मांडलेला आहे. मराठी माणसाच्या घराघरात मनामनात चाललेला हा संवाद शब्दात पकडून श्रोत्यांपर्यत पोचविला म्हणून मला व्यक्तिशः कविता आणि नाटक या दोन वाङ्:मय प्रकारामध्ये वि.वा.शिरवाडकर / कुसुमाग्रज कमालीचे यशस्वी झालेले आहेत असे वाटते.

कुसुमाग्रजांच्या एकूण साहित्यापैकी आपणास येथे फक्त त्यांच्या काव्यातील प्रतिमा इतकाच विचार येथे अभिप्रेत आहे. कुसुमाग्रजांच्या नावावर एकूणा १४ कविता संग्रह आहेत ते खालीलप्रमाणे.

## कुसुमाग्रजांचे कविता संग्रह

१.जीवनलहरी १९३३

२.विशाखा १९४२

३.समिधा १९४७

४.किनारा १९५२

५.मराठी माती १९६०

६.स्वगत १९६२

७.हिमरेषा १९६४

८.वादळवेल १९६९

९.छंदोमयी १९६९

१०.मुक्तायण १९६९

११.पाथेय १९५६

१२.मेघदूत १९५६

१३.रसयात्रा १९६९

१४.प्रवासी पक्षी -

अशा प्रकारे कुसुमाग्रजांच्या नावावर एकूण १४ कवितासंग्रह आहेत. त्यापैकी मैलाचा दगड ठरलेला कविता संग्रह ज्या कविता संग्रहाने घराघरात लपून बसलेला परंतु देशावर प्रेम असलेला तरुणांच्या मनात देशप्रेमाची ज्योत पेटविली व महात्मा गांधींच्या चळवळीला बळकटी दिली. तो कविता संग्रह म्हणजे **''विशाखा''** या कवितासंग्रहातील प्रतिमाचा विचार येथे करावयाचा आहे.

आशावादामधून आलेली भव्यदिव्यता,विचारांची सामाजिक दृष्टी,निसर्ग व प्रेम भावना यांचा तरल काव्यात्म अविष्कार स्वातंत्र,समता,बंधुता आणि मानवतावाद ही कुसुमाग्रजांच्या काव्यलेखनाची काही वैशिष्ये सांगता येतात.

कविता ही शब्दाची बनलेली असते. मात्र त्या शब्दांना एकच एक अर्थ नसतात. कवितेमधील हे शब्द वेगवेगळे अर्थ व वेगवेगळे सौदर्य निर्माण करतात रुपक,उपमा, अलंकार,प्रतिमा,प्रतिके,आदिबंध इत्यादी कवितेच्या उपायोजनाने कवितेची **अर्थगर्भता** समृध्द होते असे वसंत आवाजी डहाके यांनी म्हटले आहे [१]. कुसुमाग्रजांच्या कवितेच्या बाबतीत ही **अर्थगर्भता** महत्वाची असून त्यामध्ये प्रतिमांचा केलेला वापर फारच महत्वाचा आहे.

**प्रतिमा म्हणजे काय?**

कवितेमध्ये शब्द असतात प्रत्येक शब्दाला स्वत:ची अशी एक प्रतिमा असते. त्यामध्ये ध्वनीप्रतिमा,अक्षरप्रतिमा,आणि अर्थप्रतिमा असते.शब्द उच्चारला अथवा वाचला की कोणत्या तरी पदार्थाचा बोध होतो तो पदार्थ मूर्त किंवा अमूर्त असतो त्याचे दृश्य वा आकार आपल्या मनात साकारला जातो त्यामधून कवितेच सौंदर्य आणि आशय आणि सौंदर्य विकसित करीत असतात.[२]

प्रतिमा ही केवळ एकेरी गोष्ट नसते. तर ती एक गुंतागुंतीची संघटना असते. एखादया अर्थप्रतिमेचा शब्दासमोर दुसरा शब्द ठेवला आणि त्यांना जोडले की तर त्या दोन्ही शब्दांच्या एकेरी प्रतिमा निर्माण होतात. ''एक निराळा शब्द काव्यात आलेला दिसतो. किंवा निराळया अर्थाने आलेला शब्द दिसतो. दोन शब्दाच्या सहयोगाने निर्माण करतो. या तिस-या शब्दालाच प्रतिमा असे म्हटले जाते''.[३] वसंत आवाजी डहाके म्हणतात याचा अर्थ प्रतिमा म्हणजे एखादया पदार्थाचे दृश्य प्रकटीकरण होय.

चित्र,पुतळा,मूर्ती ही त्याची उदा. आहेत. दोन वस्तूमधील साम्य एक दुस-याची प्रतिमा कल्पना स्मृती यांनी काढलेली मनात चित्रे मानसिक चित्र किंवा कल्पना ,रुप,रंग,पैलू अथवा रुपक होय.

सुधीर रसाळ म्हणतात. उच्चारांनी चिन्हांकित होणा-या दोन किंवा अधिक मानसिक संदर्भामध्ये घडणा-या साधर्म्य वैधर्मधिष्ठीत अंतर प्रक्रियेमधून निर्माण होणारी मूर्त गतीशील अनेककार्थी सेंद्रीय संघटना म्हणजे प्रतिमा होय.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

थोडक्यात प्रतिमा या चित्ररुप असतात. चित्रात रेषा आणि रंग यामधून प्रतिमा साकार होतात. कवितेत शब्दांच्या अर्थामधून प्रतिमाची निर्मिती होत.त्यामध्ये ध्वनी प्रतिमाही मिसळून जाते.

विशाखा या कवितासंग्रहामधील प्रतिमांचा विचार करताना आपणास पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येते.

१.निसर्ग प्रतिमा

२.दृकश्राव्य प्रतिमा

३.स्पर्शात्मक प्रतिमा

४.गंधात्मक प्रतिमा

५.रसात्मक प्रतिमा

**१.निसर्गप्रतिमा**

निसर्गप्रतिमा ही कुसुमाग्रजांची आवडती प्रतिमा आहे. सामाजिक आणि राष्ट्रीय आराम व्यक्त करण्यासाठी या निसर्ग प्रतिमांचा अत्यंत कल्पकतेने वापर केलेला आहे. उदा. दुभंगणारी धरणी, लाजरा मंगल ,हजार निसर्ग प्रतिमा  गर्जणारा समुद्र, क्षुद्र गवताची पाती इ. निसर्ग प्रतिमा कोलंबसाचे गर्वगीत या कवितेत वापरलेल्या आहेत.

**२.दृकश्राव्य प्रतिमा**

अनुभव हा सेंद्रीय असतो. म्हणजे त्यामध्ये दृकश्राव्य हे घटक असतात. कुसुमाग्रज यांचा वापर करुन तशी प्रतिमा आपल्या कवितेत साकार करतात.उदा. समुद्राच्या लाटा (कोलंबसाचे गर्वगीत) खळखळणारा नीळसर झरा (वनराणी) वाजत गाजत येणारी मिरवणूक (भक्तीभाव) रातकिडयांचे हिरवळीवरील भावगीत यामधील दृश्य अनुभवालाही कुसूमाग्रजांची श्राव्य संवदेनाची जोड दिलेली आहे. हिरवळीला गुणगुणायला लावून दृक व श्राव्य याचे एकात्म चित्रण येथे केले आहे.

**३.स्पर्शप्रतिमा**

स्पर्श हा शरीर अनुभवीय महत्वाचे अंग आहे . कातडी हे इंद्रिय संवेदना स्पर्श प्राप्त करुन देणे.

उदा.  ‘‘ काढ  सखे गळयातील

तुझे चांदण्याचे हात

क्षितीजांच्या पलिकडे उभे

दिवसाचे दूत...... !’’

येथे श्रृंगारामधील स्पर्शप्रतिमा साकरली आहे. ध्येय वाद पूर्ण करण्यासाठी प्रियकर स्पर्श नाकारतो असे वर्णन या कवितेत येते.

**४.गंधप्रतिमा**

मानवी अनुभवामधील गंध ही सुध्दा एक महत्वाची  संवदेना आहे. तिचा अनुभव  नाक या इंद्रियेव्दारा येतो. अशा गंधाच्या प्रतिमा यामध्ये फारसा नाहीत.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

स्वनांची समाप्ती या कवितेत प्राजक्तांच्या फुलांचा गंध हा वा-याबरोबर वाहतो आहे. तर ‘मातीची दर्पोक्ती’ या कवितेत मातीचा दर्प दरवळतो आहे. माळाचे मनोगत या कवितेत वारा हा सुगंधी आणि शीतल आहे. या सुगंधाचा मागोवा ‘शेवटचे पान’ या कवितेत घेतलेला आहे.

**५.रसात्मक प्रतिमा**

कुसुमाग्रजांच्या काव्यात सर्व नऊ रसांच्या प्रतिमा सापडत नाहीत. शृंगार आणि वीर रसच प्रामुख्याने आढळतो. पृथ्वीचे प्रेमगीत,आस,स्वनांची समाप्ती इत्यादी कवितांमध्ये शृंगाररस आढळतो. तर क्रांतीचा जयजयकार इ. कवितांमध्ये वीररस आढळतो.

याशिवाय कुसुमाग्रज कधी कधी एकत्र प्रतिमा दोन अर्थानी वापरतात उदा. आग हे प्रतिक प्रेम कवितेत विरहायी आग तर राष्ट्रीय कवितेत क्रांतीची आग म्हणूनही वापरले आहे.

अशाप्रकारे कुसुमाग्रजांनी पारंपारीक प्रतिमा वापरुन कधी पारंपारीक आशय तर कधी आधुनिक आशय व्यक्त केला आहे.

**संदर्भ**

१.वसंत आवाजी डहाके ‘कवितेविषयी’ स्वरुप प्रकारात

औरंगाबाद पृ.क. ९२

१९९९

२.तत्रैय पृ.क.९२/९३

३.तत्रैय पृ.क ९३

४.पत्रैय पृ.क. ९३